होमगार्ड दलातील स्वयंसेवकांच्या
भत्त्यात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एचजीएस २०१९/प्र.क्र.३८/अ/विशा-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ मार्च, २०१९

<u>वाचा :</u> १) शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एचजीएस २०११/प्रक्र ४७/तेरा, दिनांक १४.२.२०१४
२) शासन निर्णय क्रमांक बिव्हीपी ०८१८/प्रक्र ९५/पोल-८, दिनांक २८.२.२०१९

<u>प्रस्तावना</u>:-

होमगार्ड स्वयंसेवक हे मानसेवी असल्याने त्यांना कर्तव्यापोटी मानधन दिले जाते. त्यांच्याकडून होणारे मोलाचे कार्य विचारात घेता, संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १४.२.२०१९ अन्वये विहित केलेल्या भत्त्याच्या दरात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र ६३७३/२०१ व सिव्हील अपिल क्र २७५९/२०१५ मध्ये होमगार्ड स्वयंसेवकांचे मानधन वाढविण्याबाबत निकाल दिलेला आहे. या आदेशानुसार केंद्र शासनाने त्यांचे पत्र दिनांक ११/४/२०१८ अन्वये देशातील सर्व राज्यात होमगार्ड स्वयंसेवकांचे मानधन हे त्या त्या राज्यातील पोलीस कर्मचाऱ्याच्या किमान वेतनानुसार समान करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

होमगार्ड व पोलीस पाटील यांच्या मागण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती संदर्भाधीन क्र. २ शासन निर्णय दिनांक २८.२.२०१९ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

मंत्रीमंडळ उपसमितीची दिनांक १.३.२०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या मंत्रीमंडळ उपसमितीने होमगार्डच्या मानधनात वाढ करण्याचा खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

१. होमगार्ड स्वयंसेवकांचा कर्तव्य भत्ता रु ३०० प्रतिदिन मध्ये वाढ करुन तो रु ५७० प्रतिदिन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. धुलाई भत्त्याचा समावेश कर्तव्य भत्त्यामध्ये करण्यात येत आहे. यामुळे धुलाई भत्ता वेगळयाने अनुज्ञेय होणार नाही. इतर भत्त्यामध्ये बदल करण्यात आलेला नाही.

३. सद्या प्रशिक्षण दरम्यान होमगार्डसना भोजनासाठी भत्ता देण्यात येतो. सदर भत्ता अपूराअसल्याने या भत्या ऐवजी होमगार्डच्या जेवणाची व्यवस्था प्रशिक्षण केंद्रावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. यासंदर्भात होणारा खर्च “मागणी क्र बी-१, २०७०- इतर प्रशासनिक सेवा- (००)(१०७) होमगार्ड (००)(०१) होमगार्ड- दत्तमत (२०७० ०२८१)- २८- व्यावसायिक सेवा” या लेखाशिर्षाखाली वेळोवेळी मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा व त्या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा.

५. ही भत्तेवाढ दिनांक १.४.२०१९ पासून लागू करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३०९१७२७०७७४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2019.03.09 17:30:17 +05'30'

(दि.व. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.राज्यमंत्री (गृह - ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (गृह -शहरे) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
७. महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
९. उपमहासमादेशक,होमगार्ड, मुंबई
१०. सर्व जिल्हा समादेशक, होमगार्ड.
११. समादेशक, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, घाटकोपर, मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. वित्त विभाग, (व्यय-८ / अर्थसंकल्प १०), मंत्रालय, मुंबई
१५. निवड नस्ती, विशा-८, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.